| MHLA160001232011 | **<u>नियमित दिवाणी दावा क्र.०५/२०११</u>**<br>**<u>निर्मला व ईतर वि. माणीक व ईतर</u>** |
| --- | --- |

–:: **<u>नि.क्र.१५१ लगत आदेश</u>** ::–

१५. वादीचे अधिवक्ता श्री. आर.एम. पाटील आणि प्रतिवादीचे अधिवक्ता श्री. बी.व्ही. पाटील यांचा युक्तिवाद सविस्तर ऐकला. मी प्रकरणाचे काळजीपूर्वक अवलोकन केले. आदेश दि.०३/०४/२०२५ प्रमाणे यादी निशाणी १०६ लगत दाखल कागदपत्रांना निशाणी दिलेली आहे. परंतु त्याप्रमाणे सदर कागदपत्रांवर किंवा रोजनाम्यामध्ये निशाणी क्रमांक टाकलेले नाहीत. सबब सदरची स्थिती स्पष्ट करण्यात आली. त्या कागदपत्रांना खालीलप्रमाणे निशाणी देण्यात येईल.

१) अरुणाबाई माणिकराव सोमवंशी यांचा निर्गम उतारा निशाणी – १५५.

२) निर्मलाबाई माणिकराव सोमवंशी यांचा निर्गम उतारा निशाणी – १५६.

३) आकाश संजय मोरे यांच्या जन्माचा दाखला निशाणी – १५७.

४) अविनाश संजय मोरे यांच्या जन्माचा दाखला निशाणी – १५८.

५) नमुना ८–अ – निशाणी – १५९.

६) फेरफार क्र.१५ – निशाणी – १६०.

७) फेरफार क्र.१८२ – निशाणी – १६१.

८) फेरफार क्र.२४१ – निशाणी – १६२.

९) फेरफार क्र.३३१ – निशाणी – १६३.

१०) फेरफार क्र.३४८ – निशाणी – १६४.

११) फेरफार क्र.३५६ – निशाणी – १६५.

१२) फेरफार क्र.३८९ – निशाणी – १६६.

१३) फेरफार क्र.४६३ – निशाणी – १६७.

१४) आठ गाव नमुना – ७/१२ – निशाणी – १६८–क ते १६८–झ.

१६. तसेच प्रतिवादींनी यादी निशाणी १३८ लगत खरेदीखत क्र.७१२/२९९ व ३०३९/२००० दाखल केलेले आहेत. त्या यापूर्वीच अनुक्रमे निशाणी १४४ व १४५ प्रमाणे निशाणीबध्द झालेले आहेत. यादी निशाणी १३८ व १४८ सोबत न्यायालयीन प्रकरणाच्या प्रमाणित प्रती दाखल आहेत. त्यामधील मजकुराच्या सत्यतेबाबत गृहीतक आहे. वादीचे अधिवक्त्यांनी सदर प्रमाणित प्रतींना निशाणी देण्यास नाहरकत दिलेली आहे. सबब त्यांना खालीलप्रमाणे निशाणी देण्यात येते.

१) नि.दि.दा.क्र.४०२/२००८ मधील न्यायनिर्णय – निशाणी – १६९.

२) नि.दि.दा.क्र.४०२/२००८ मधील हुकूमनामा – निशाणी – १७०.

३) नि.दि.दा.क्र.४०३/२००८ मधील हुकूमनामा – निशाणी – १७१.

४) नि.दि.दा.क्र.४०३/२००८ मधील न्यायनिर्णय – निशाणी – १७२.

५) एस.टी.सी. क्र.७०/२००९ मधील न्यायनिर्णय – निशाणी – १७३.

६) फौ.अ.क्र.१०/२०१९ मधील न्यायनिर्णय – निशाणी – १७४.

त्याप्रमाणे सरतपास पूर्ण झालेला आहे.

( श.अ. सुरजुसे )

दि. ३१/०७/२०२५. दिवाणी न्यायाधीश क. स्तर, **देवणी**.

**–::वादीकरिता उलटतपास विधीज्ञ श्री. आर.एम. पाटील यांच्यामार्फत शपथेवर सुरू ::–**

१७. माझे शिक्षण बी.ए. पदवीपर्यंत झाले आहे. माझे शिक्षण वर्ष १९७७ मध्ये झाले. त्यानंतर तीन ते चार वर्षांनी मी लिपिक वजा सेल्समन म्हणून महाराष्ट्र स्टेट को–ऑपरेटीव्ह कन्स्यूमर फेडरेशन ली. मुंबई, विभागीय कार्यालय, औरंगाबाद येथे नोकरीवर लागलो होतो. माझा भाऊ माणीक हा दहावी पास आहे. त्यांस नोकरी नव्हती. मला दोन भाऊ होते. आमची वडिलोपार्जित जमीन अनंतवाडी शिवारात होती. वाद मिळकत वडिलोपार्जित आहे हे म्हणणे खरे आहे. वर्ष १९८९ मध्ये माझ्या आणि माझ्या भावांमध्ये मिळकतीच्या वाटण्या झाल्या. त्यामध्ये माणीकला हिस्सा मिळाला होता. माणीक, त्यांची पत्नी व मुलगी यांची दावा मिळकत एकत्रित कुटुंबाची मिळकत होती. हे म्हणणे खरे नाही

की, माणीक भोळसर आहे. नमूद व्यवहाराच्या पूर्वी माणीक आणि त्यांचे कुटुंब शेतीचा व्यवसाय करीत होते.

प्रश्न – माणीक च्या कुटुंबाचा उदरनिर्वाह शेतीवर होता ?

उत्तर – माणीक कडे ईतर सुद्धा उत्पन्नाचे साधन होते.

१८. हे म्हणणे खरे नाही की, वादींना नमूद व्यवहारांची माहिती नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, माणीक व्यसनी होता. हे म्हणणे खरे नाही की, मी वर्ष २००० पूर्वी माणीकला अडी–अडचणीमध्ये आर्थिक मदत करीत होतो. हे मला माहीत नाही की, माणीकच्या कुटुंबावर आर्थिक तान होता. साक्षीदार स्वत:हून सांगतो की, त्या वेळी मी औरंगाबाद येथे राहत होतो, त्यामुळे मला माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी त्या दरम्यान माझी शेती स्वतः कसत होतो. साक्षीदार स्वत:हून सांगतो की, मी माझी शेती वाट्याने दिली होती. मी त्याकरिता माझ्या गावी वर्षातून एकदा येत होतो. माझे आणि माणीकचे गावामध्ये एकाच भूखंडामध्ये घरे आहेत. हे म्हणणे खरे नाही की, वादीच्या आईने शेतातील उत्पन्नामधून आणि पाहुण्यांकडून उसने पैसे घेऊन वादींचे लग्न केले. हे म्हणणे खरे नाही की, मी शासकीय योजनेचा लाभ मिळण्याचे सांगून माणीकच्या सह्या घेतल्या आणि खोटे खरेदीखत करून घेतले. हे म्हणणे खरे नाही की, मी साक्षीदारांशी संगनमत करून माणीकला काहीही न सांगता त्यांच्या खरेदीखतावर सह्या घेतल्या. हे म्हणणे खरे नाही की, माणीक आणि त्याच्या पत्नीला कोणाचेही कर्ज नव्हते.

प्रश्न – माणीक कडे कर्ज होते याबाबत काही पुरावा दाखल करू शकता काय

उत्तर – त्याच्याकडे खाजगी लोकांचे कर्ज होते.

१९. मला सदर खाजगी लोकांची नावे सांगता येत नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, मी दिलेली रक्कम माणीकने त्याच्या घरच्या करिता वापरलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी माणीकला जमिनीचा योग्य व संपूर्ण मोबदला दिला नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, वादी क्र.२ चे लग्न वर्ष २००४ नंतर झाले. हे म्हणणे खरे आहे की, माणीकच्या पत्नीला कोणताही आजार नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, वर्ष २००२ ते २०१०

दरम्यान मी दावा मिळकत वाट्याने कसत होतो आणि वादी व त्यांची आई यांना त्यांचा हिस्सा देत होतो.

प्रश्न – तुम्ही डिसेंबर २०१० मध्ये वादींना वाट्याचा हिस्सा दिला नव्हता

उत्तर – मी वाट्याने जमीन केलीच नव्हती.

२०. हे म्हणणे खरे नाही की, वादींनी मला वाट्याच्या हिस्याची मागणी केली होती व मी सदर जमीन खरेदी केली वाटा देणार नाही असे सांगितले. हे म्हणणे खरे नाही की, मी वादींना वाद जमिनीमधून हाकलून दिले. हे म्हणणे खरे नाही की, खरेदीखत बेकायदेशीर आहे. वादी निर्मलाचे लग्न वर्ष १९९९ च्या आधी झाले. हे म्हणणे खरे नाही की, नमूद खरेदीखतानंतर निर्मलाचे लग्न झाले. हे म्हणणे खरे नाही की, माणीकने त्याच्या मुलींना मिळकतीचे वाटप दिले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, माणीकला मुलगा नसल्याने जमीन हडप करण्याची माझी मनीषा होती. हे म्हणणे खरे नाही की, मी माणीकला दारू पिण्यास मदत करीत होतो.

प्रश्न – मी सावकारी केल्याबाबत माणीकने तक्रार केली होती ?

उत्तर – तक्रार केली होती.

२१. हे म्हणणे खरे नाही की, खरेदीखताचा व्यवहार झालेलाच नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटे शपथपत्र दाखल केले आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी साक्ष दिली.

उलटतपास पूर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत सा.वा.दा.ख.व.ब.अ.क.केले.

स्वा/–

( श.अ. सुरजुसे ) ( श.अ. सुरजुसे )

दिवाणी न्यायाधीश क. स्तर, **देवणी**. दिवाणी न्यायाधीश क. स्तर, **देवणी**.

दि. ३१/०७/२०२५.